**<u>प्रेसनोट दि.२६/०६/२०१९</u>**

**<u>वानवडी पोलीस स्टेशन पुणे</u>**

**पोलीसांनी समुपदेशन करून,पतीचे मनपरीवर्तन करुन मुलीस दिले पत्नीच्या ताब्यात**

दोन दिवसांपुर्वी एक महिला,रा.वानवडी, पुणे. व त्यांचे पती यांचे घरगुती कारणांवरून भांडण झालेली होती. परंतू पती यांनी त्यांची दोन वर्षाची मुलगी स्वतःकडे ठेऊन घेतली घेवुन,पत्नीस माहेरी पाठवुन देलेले होते. सदर मुलीचे विरहामध्ये सदर महिला ही मानसीकरित्या खचलेली होती. त्याबाबत तक्रार देण्याकरीता पोलीस स्टेशन येथे आलेल्या होत्या. मुलांचा ताबा देणे हि बाब पोलीसांचे अखत्यारित येत नव्हती. परंतू सदर महिलेची अवस्था पाहता पोलीस उप-निरीक्षक,अभिजित जोगदंड यांनी सदर महिलेचे पतीस समक्ष बोलावून घेवुन,त्यांना समुपदेशन करून त्यांचे मनपरीवर्तन केल्याने सदर महिलेच्या पतीने दोन वर्षाची मुलगी तीचे आईकडे सुपर्त केली. सदरबाबत मुलीची आई हिने पोलीस उप-निरीक्षक, जोगदंड व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, क्रांतीकुमार पाटील यांचे आभार मानले व आनंदाश्रुसह तीचे घरी निघून गेली.

(क्रांतीकुमार पाटील)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
वानवडी पोलीस स्टेशन पुणे